साप्ताहिक
चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष
# चपराक
• वर्ष : १८
• अंक : ११
• पाने : ८
पुणे
मूल्य ६/-
www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. ४ ते १० मे २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

# बारामतीची नवी ओळख : पुस्तक जत्रा

**गुरुवर्य प्राचार्य राम शेवाळकर म्हणायचे, “आपल्याकडे कसलेही निमंत्रण न देता दारूच्या दुकानाबाहेर रांगा लागतात आणि दूधवाल्याला मात्र घरोघर जाऊन दुधाचा रतीब टाकावा लागतो.” काळ कोणताही असला तरी चांगल्या गोष्टीसाठी असा संघर्ष करावाच लागतो. कौरव शंभर असूनही पांडव मात्र पाचच असतात पण या पाच जणांवर सगळे महाभारत बेतते. चांगल्या गोष्टी कमी असल्या तरी चांगलं काम करणारी मंडळी हेच खरे ‘आकाशाचे खांब’ असतात. बारामती येथील ‘सामाजिक विकास प्रतिष्ठान’ या संस्थेचे प्रा. रवींद्र टकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी असाच एक सकारात्मक, प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे. हा उपक्रम म्हणजे क्रांतिज्योती सावित्रीबाई पुस्तकाची जत्रा!**

खरं तर आपल्याकडे दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होतं. अनेक विभागीय संमेलने होतात, ग्रंथ प्रदर्शने भरतात. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यापासून तर सतत भाषाविषयक उपक्रम, कार्यक्रम सुरूच आहेत. गेल्या काही काळात पुण्यात सुरू झालेला पुस्तक महोत्सव, बाल महोत्सव याचीही सर्वत्र चर्चा आहे. असे असताना बारामतीत ही जत्रा कशासाठी? तर आजही महाराष्ट्रातल्या अनेक तालुक्यात पुस्तकांची समृद्ध दालने नाहीत. तिथे फारसे साहित्यिक कार्यक्रम होत नाहीत. ‘जत्रा’ हे गावचं आकर्षण असतंच. मग पुस्तकांची जत्रा भरवायला काय हरकत आहे? असा विचार झाला आणि ही मंडळी त्यासाठी पुढे सरसावली. घरातलं एखादं लग्नकार्य असावं अशा लगबगीनं त्यांनी तयारी केली.

या जत्रेत ‘चपराक’सह अनेक महत्त्वाच्या प्रकाशकांची पुस्तके उपलब्ध असणार आहेत. प्रशांत केंदळे, राजेंद्र सोमवंशी, नितीन चंदनशिवे, हनुमंत चांदगुडे असे आजचे आघाडीचे कवी इथे समक्ष ऐकायला मिळतील. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी अनुभवायला मिळतील. डॉ. सोमनाथ मुटकुळे सावित्रीबाईंचा दमदार कार्यक्रम सादर करतील. शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे त्यांचं चिंतन मांडतील. इंजि. हेमचंद्र शिंदे आणि डॉ. हर्षदा शिंदे करिअरविषयक मार्गदर्शन करतील. रसिका तुळजापूरकर-उपळेकर आणि अक्षय उपळेकर ही जोडी अभिवाचन कसे करावे याचा नाट्यमय आविष्कार दाखवून देतील. श्रीराम मोहिते सुलेखनाची कार्यशाळा घेतील. तब्बल १७० वर्षांनी सावित्रीबाई फुले यांचा ‘काव्यफुले’ हा कवितासंग्रह यानिमित्त वाचकांच्या भेटीस येईल. एका पुस्तक जत्रेमुळे अशा कितीतरी गोष्टी साध्य होणार आहेत. साहित्य रसिकांसाठी यापेक्षा मोठी पर्वणी कोणती असू शकते...?

इथे तुम्हाला लेखक, कलाकार अनुभवता येतील. पुस्तकांची मनसोक्त खरेदी करता येईल. त्याशिवाय महत्त्वाचे म्हणजे तुमच्या साहित्यिक जाणीवा समृद्ध होतील. बारामती हे केवळ औद्योगिक किंवा राजकीय ऊर्जाकेंद्र नाही. कऱ्हा नदीच्या काठी वसलेल्या या शहराला मोठा साहित्यिक वारसा आहे. इथल्या पराडकर वाड्यात बसून कविवर्य मोरोपंतांनी अनेक रचना केल्या. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या दूरदृष्टितून इथे गदिमा नाट्यगृह उभारलं गेलं. कृषी-विज्ञान केंद्र,



**संपादकीय**
**घनश्याम पाटील ७०५७२९२०९२**

त्यामाध्यमातून होणारं साहित्य संमेलन, पुस्तक कट्टा, वेळोवेळी होणारी कवी संमेलने अशा सगळ्यांमुळं या शहराला एक चैतन्य आहे. मराठवाड्यातल्या दुष्काळी भागातून आलेला माझ्यासारखा सामान्य माणूस बारामतीचं ऐश्वर्य पाहून, इथली समृद्धी पाहून भारावून जातो. या सगळ्या पार्श्वभूमीवर आधुनिक मराठी काव्याची जननी असलेल्या सावित्रीमाईंच्या नावानं इथं पुस्तकांची जत्रा सुरू होणं म्हणूनच गौरवास्पद आहे. रवींद्र टकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या अथक प्रयत्नातून सुरू झालेला हा उपक्रम राज्यभर विस्तारेल आणि पुढच्या वर्षीपासून इथं होणाऱ्या कार्यक्रमात सहभाग मिळणं, इथं पुस्तकांचं दालन उभारणं प्रत्येकासाठी अभिमानास्पद असेल.

धडाकेबाज नेते असलेल्या ना. अजितदादांच्या अपघाती निधनानंतर बारामती अक्षरशः पोरकी झालीय. त्यांच्या पश्चात अत्यंत धीरोदात्तपणे सुनेत्रावहिनींनी उपमुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारली आहेत. दादांची पोकळी कधीही भरून न येणारी असली तरी वहिनींनी जे धाडस दाखवले त्याची तुलना अनेकांनी महाराणी ताराबाई यांच्याशी केली. त्यांचं हे यशही संघर्षातून ताऊन-सुलाखून आलेलं आहे. आमच्या मराठवाड्यातल्या तेरसारख्या छोट्या गावातून आलेल्या वहिनींना माहेर आणि सासर दोन्हीकडून तगडी राजकीय पार्श्वभूमी आहे. त्या मातृहृदयी आहेत. दादांसारखा कणखरपणा आणि खमकेपणा त्यांनी दाखवावा, अशी बारामतीकरांची अपेक्षा आहे. बारामतीच्या विकासात पवार कुटुंबीयांचं जे योगदान आहे ते वादातीत आहे. सुनेत्रावहिनी हा वारसा समर्थपणे चालवतील, याबाबत कुणाच्याच मनात दुमत नाही. या पुस्तक जत्रेत ज्येष्ठ नेते शरदराव पवार, सुनेत्रावहिनी, आ. रोहित पवार यांचाही सहभाग असणार आहे. लेखकांना, कलाकारांना सामावून घेणे, त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करणे ही पवार घराण्याची खाशियत आहे. पुस्तक जत्रेसारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमास व्यापक स्वरूप देण्याची धमक त्यांच्यात आहे. आजवर बारामती ज्या-ज्या कारणांसाठी ओळखली जाते त्यातील पुस्तक जत्रा हा एक महत्त्वाचा उपक्रम होऊ शकतो. भविष्यात बारामती ग्रंथपंढरी झाली तर समाजस्वास्थ्याच्या दृष्टिने ते अधिक पोषक ठरणार आहे. ‘पुस्तक हेच मस्तक’ असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. माणसाच्या जडणघडणीत पुस्तकांचे योगदान मोलाचे असते. माहिती, मनोरंजन आणि ज्ञान देणारी पुस्तके माणसाला ‘रद्दी’ होण्यापासून वाचवतात, हे अनेकांनी वेळोवेळी सप्रमाण सिद्ध केले आहे. बारामतीसारख्या प्रगत भागात सुरू झालेला हा उपक्रम वर्धिष्णू होवो, यासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा! या उपक्रमात ‘चपराक परिवारा’चा सहभाग दरवर्षी असेल, इतकेच सांगतो, आयोजकांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

## या हो या हो अवघे जन...

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक जत्रा या नावाने बारामतीमध्ये प्रथमच अशी पुस्तकांची जत्रा भरवली जात आहे. आज मोबाईल, इंटरनेटच्या जगात पुस्तकांची आवड निर्माण करणे म्हणजे आनंदी जीवनाला सुरुवात करणे, असंच म्हणावं लागेल. ज्या घरामध्ये पुस्तके वाचली जातात तिथे संवाद चांगला असतो. ज्ञानवृद्धी होताना दिसते आणि म्हणून ग्रामीण भागात वैचारिकता, आनंद आणि समृद्धता आणायची असेल तर पुस्तकांशिवाय पर्याय नाही.

अलीकडच्या काळामध्ये शहरी भागामध्ये पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक संमेलने होतात परंतु ग्रामीण भागाचे लोक तिथपर्यंत पोहोचू शकत नाहीत. म्हणून हा ‘सामाजिक विकास प्रतिष्ठान’ बारामतीने केलेला एक महत्त्वपूर्ण प्रयोग आहे. ‘पुस्तकांची जत्रा’ ही केवळ पुस्तक विक्रीची जागा नसून ज्ञान, संस्कार आणि प्रेरणा देणारा एक उत्सव आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येतात आणि ते आत्मविश्वासाने पुढे जाण्यास तयार होतात. पुस्तक जत्रेमुळे विद्यार्थ्यांना अनेक फायदे होतात. प्रथम त्यांची ज्ञानसंपदा वाढते. विविध विषयांवरील पुस्तके वाचल्यामुळे त्यांचा अभ्यास अधिक समृद्ध होतो. दुसरे म्हणजे, त्यांची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता विकसित होते. कथा वाचताना ते नवीन जग अनुभवतात, नवीन विचार करतात. तिसरे म्हणजे, वाचनामुळे भाषेचे ज्ञान सुधारते, शब्दसंग्रह वाढतो आणि व्यक्त होण्याची क्षमता अधिक चांगली होते.

पुस्तक प्रदर्शन न म्हणता पुस्तकांची जत्रा हा शब्दप्रयोग जाणून-बुजून केला आहे कारण ग्रामीण भागामध्ये जत्रा या शब्दांमध्ये आपलेपणा जास्त आहे. बारामती परिसरातील सर्व संघटना, औद्योगिक वसाहत, शाळा, कॉलेजेस, अकॅडमी, सर्व हायस्कूलचे विद्यार्थी, पालक या सगळ्यांपर्यंत या पुस्तक जत्रेचे निमंत्रण पाठवले आहे. लोकांचा भरभरून प्रतिसाद मिळेल असा मला विश्वास वाटतो. सर्वांनी या जत्रेत अवश्य सहभागी व्हावे. साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घ्यावा आणि भरपूर पुस्तक खरेदी करावी ही आयोजक या नात्याने विनंती.



**प्रा. रवींद्र टकले**
**अध्यक्ष, क्रांतिज्योती सावित्रीबाई पुस्तकांची जत्रा समिती । ९४२३५८७६१०**

# सावित्रीबाई फुलेंचा ‘काव्यफुले’ वाचकांच्या भेटीला

## पावणे दोनशे वर्षांनी पुनर्मुद्रण : बारामतीतील पुस्तक जत्रेत होणार प्रकाशन; ‘चपराक प्रकाशन’चा पुढाकार

**पुणे (प्रतिनिधी) :** आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा १८५४ साली प्रकाशित झालेला ‘काव्यफुले’ हा कवितासंग्रह आता पावणे दोनशे वर्षांनी पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला येत आहे. त्यासाठी चपराक प्रकाशनच्या घनश्याम पाटील यांनी पुढाकार घेतला असून येत्या ९ मे रोजी बारामती येथे होत असलेल्या पुस्तक जत्रेत त्याचे प्रकाशन होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जोतीराव फुले यांच्या सर्वच क्रांतिकार्यात सावित्रीबाई पूर्णपणे सक्रिय होत्या. मात्र कवयित्री म्हणून त्यांची कायम उपेक्षाच झाली. काव्यफुले या त्यांच्या कवितासंग्रहात निसर्गविषयक, सामाजिक, आत्मपर, बोधपर, इतिहासविषयक कविता आहेत. पहिल्याच कवितेत त्यांनी शंकराची प्रार्थना केली आहे. सावित्री आणि जोतीबांचा संवादही त्यांच्या कवितेद्वारे प्रकटला आहे. शंकर हे त्यांचे आराध्य दैवत असल्याने त्यांनी शिवप्रार्थना तर केली आहेच पण पहिल्या आवृत्तीच्या मुखपृष्ठावर शिवपार्वतीचे चित्र रेखाटलेले आहे.

आदिशक्ती शंकरानंतर त्यांनी जोतीबांवर कविता करून त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली



मराठी साहित्यात कवी केशवसूत यांना आधुनिक काव्याचे जनक मानले जाते. त्यापूर्वी मराठीत संतकाव्य आणि तंतकाव्याची परंपरा होतीच. ती मोडून सामाजिक प्रश्नांवर तसेच निसर्गावर कविता करणाऱ्या सावित्रीबाई फुले याच आधुनिक मराठी काव्याच्या जनक ठरतात. केशवसुतांचा जन्मच मुळात सावित्रीबाईंचा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यानंतर जवळपास बारा वर्षानंतर झाला. त्यामुळे आद्य कोण हा प्रश्न निकाली निघतो. सावित्रीबाईंनी मराठीला मुक्त काव्याच्या प्रांगणात सोडले हे त्यांचे आद्य असल्याचे श्रेय हिरावून घेता येणार नाही. चपराकने त्यांच्या कवितासंग्रहाचे पुनर्मुद्रण केल्याने हे सारे वाचकांपर्यंत पोहोचणार आहे.

**–संजय सोनवणी,** सुप्रसिद्ध लेखक आणि संशोधक



महात्मा जोतीबा फुले यांचे हे द्विशताब्दी जन्मवर्ष आहे. त्यानिमित्त अनेक कार्यक्रम सुरू आहेत. फुले दाम्पत्य हा सामाजिक कार्यातला धगधगता निखारा आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईंनी योगदान दिले. कवितेच्या प्रांतातील त्यांचे चिंतन आजच्या समाजवास्तवातही लागू पडते. त्यामुळे त्यांचा पहिला कवितासंग्रह चपराक प्रकाशन तर्फे प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. पावणे दोनशे वर्षांनीही वाचकांचा या संग्रहाला प्रतिसाद मिळेल आणि सावित्रीबाईंच्या कविता सामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतील, अशी अपेक्षा आहे.


**–घनश्याम पाटील,** प्रकाशक

आहे. सातारा जिल्ह्यातील त्यांचे जन्मगाव असलेल्या नायगावचे वर्णन करताना त्यांनी माहेरच्या आठवणींना उजाळा दिला आहे. जोतीबांना सांभाळणारी विधवा नातेवाईक स्त्री देखील त्यांच्या काव्याचा विषय ठरली आहे.

फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावे महाराष्ट्रात गेली कित्येक वर्षे राजकारण होते. त्यांची त्यागाची परंपरा सर्वच व्यासपीठावरून सांगितली



सन १८५४ मधील पहिल्या आवृत्तीचे मुखपृष्ठ



‘चपराक’ने केलेल्या नव्या आवृत्तीचे मुखपृष्ठ

जाते मात्र त्यांच्या विचारांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. ठरावीक अभ्यासकांचा अपवाद वगळता सावित्रीबाई फुले या कवयित्री होत्या आणि तत्कालीन परिस्थितीवर त्यांनी काव्याच्या माध्यमातून जळजळीत भाष्य केले होते, हे अनेकांना माहीत नाही. त्यामुळेच वर्तमानात त्यांच्या पुस्तकाची अत्यंत आवश्यकता आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी यांनी या नव्या आवृत्तीच्या निमित्ताने प्रस्तावना लिहिली आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

---



**डॉ. विपुल पाटील**
बारामती

# समृद्ध समाजासाठी वैचारिक उत्सव

## ‘सावित्रीमाई फुले पुस्तकांची जत्रा’

बारामती येथे होणारी ‘सावित्रीमाई फुले पुस्तकांची जत्रा’ हे केवळ पुस्तकांची विक्री करण्याचे ठिकाण नाही तर ते विचारांची देवाण-घेवाण करण्याचे केंद्र आहे. ९, १० आणि ११ मे २०२६ या काळात बारामतीच्या स्वामी विवेकानंद सभागृहात भरणारा हा मेळावा म्हणजे ज्ञानाचा कुंभमेळाच आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात वाचन संस्कृती पुनरुज्जीवित होईल. जेव्हा एखादा युवक हातात पुस्तक घेतो तेव्हा तो केवळ कागद वाचत नसतो तर तो स्वतःच्या प्रगतीचा आणि पर्यायाने देशाच्या उज्ज्वल भविष्याचा नकाशा तयार करत असतो. त्यामुळे या ज्ञानरूपी जत्रेत सहभागी होणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे कर्तव्य ठरते.

‘पुस्तके म्हणजे डोळसपणे पाहण्याची शक्ती देणारी ज्ञानेंद्रिये आहेत,’ असे म्हटले जाते. आजच्या डिजिटल युगात जिथे माहितीचा महापूर आहे पण ज्ञानाची तहान अजूनही कायम आहे, अशा काळात बारामतीमध्ये आयोजित करण्यात आलेली ‘क्रांतिज्योति सावित्रीमाई फुले पुस्तकांची जत्रा’ हे केवळ एक प्रदर्शन नसून तो एक वैचारिक जागर आहे. सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र टकले सर यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेला हा तीन दिवसीय सोहळा समाजातील प्रत्येक घटकासाठी ज्ञानाची कवाडे उघडणारा ठरणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे अथांग दालन या माध्यमातून उघडणार आहे. विद्यार्थीदशेत वाचनाची गोडी लागणे हे त्यांच्या भविष्यातील प्रगतीचे पहिले पाऊल असते. या जत्रेमध्ये शैक्षणिक पुस्तकांसोबतच अवांतर वाचनासाठी उपलब्ध असणारी पुस्तके विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देतात.


९ मे रोजी होणारे ‘अक्षर, वाचन, खेळ आणि मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास’ हे सत्र मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सुलेखनासारख्या कलात्मक विषयांवरील कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या हस्तकला आणि एकाग्रतेत भर टाकतील. आजचा युवक हा उद्याच्या भारताचा आधारस्तंभ आहे. त्याला योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे. त्यासाठीच १० मे रोजीचे ‘१० वी व १२ वी नंतर काय?’ आणि ‘वैद्यकीय शिक्षण आणि ॲडमिशन’ ही सत्रे युवकांसाठी दिशादर्शक ठरतील. स्पर्धा परीक्षेच्या काळात काय वाचावे आणि कसे वाचावे, याचे उत्तर अशा जत्रेत मिळणाऱ्या संदर्भग्रंथांतून मिळते. ‘आजची लोकशाही, उद्याचा भारत देश’ आणि ‘भारतीय लोकशाही सबल होण्यासाठी नागरिकांची भूमिका’ यासारख्या परिसंवादातून युवकांमध्ये राजकीय प्रगल्भता आणि सामाजिक जाणीव निर्माण होण्यास मदत होईल. समाज जेव्हा वाचतो तेव्हाच तो विचार करतो आणि प्रगती करतो. सावित्रीमाईंच्या नावाने होणारी ही जत्रा स्त्री शिक्षणाचे आणि सामाजिक समतेचे विचार घराघरात पोहोचवण्याचे काम करत आहे. ‘कवितांची मैफिल’ तर या जत्रेचा केंद्रबिंदू राहणार आहे. हसून हसून पोट दुखवणाऱ्या व डोळ्यामध्ये अंजन घालून सामाजिक भान आणणाऱ्या कविता हे या जत्रेचे आकर्षण असेल. नामवंत, विचारवंत आणि संपादकांच्या मुलाखती ऐकल्यामुळे गुंतागुंतीच्या सामाजिक विषयांचे सोप्या भाषेत विश्लेषण सामान्य जनतेपर्यंत पोहोचते.

थोडक्यात सांगायचे झाले तर या जत्रेमध्ये विविध विषयांवरील पुस्तके एकाच छताखाली आणि तीही सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत. इतिहास, कला, साहित्य, विज्ञान आणि समाजकारण अशा सर्व विषयांची मेजवानी येथे आहे. पुस्तके विकत घेणे किंवा ती पाहणे, हा एक अनुभव असतो जो मोबाईलच्या स्क्रीनवर कधीही मिळू शकत नाही. पुस्तकांच्या पानांचा वास आणि त्यातील शब्दांची खोली माणसाला अंतर्मुख करते. बारामतीमध्ये होणाऱ्या अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे स्थानिक लेखकांना आणि कवींना व्यासपीठ मिळणार आहे. तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या समाजातील महत्त्वपूर्ण व्यक्तिंचा या जत्रेत पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या सोहळ्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव होणार आहे. ज्यामुळे नवीन पिढीला समाजसेवेची आणि लेखन-वाचनाची प्रेरणा मिळेल.

थोडक्यात सांगायचे झाले तर साहित्यावर प्रेम करणाऱ्या बारामती नगरीमध्ये होणारी ही पुस्तकांची जत्रा म्हणजे साहित्य रसिकांसाठी एक उत्कृष्ट मेजवानी असणार आहे, जिचा लाभ प्रत्येक बारामतीकराने घेतलाच पाहिजे.

‘चपराक’ हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# करिअरवर बोलू काही...



इंजि. हेमचंद्र शिंदे
अध्यक्ष, सेंटर फॉर करिअर गायडन्स, बारामती

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आणि समाजसुधारक होत्या. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तकांची जत्रा' दिनांक ९, १० व ११ मे रोजी बारामती येथे आयोजित केली आहे.

त्यांच्या स्मरणार्थ आयोजित केली जाणारी ही पुस्तक जत्रा म्हणजे केवळ पुस्तकांची विक्री नसून ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा उत्सव आहे. मित्रांनो, आज आपण सर्व जण मोबाईल आणि इंटरनेटच्या जगात जगत आहोत. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडिया आणि इंटरनेटमुळे लोकांचा वेळ मोठ्या प्रमाणात स्क्रीनवर जातो पण अशा परिस्थितीतही वाचनाचा छंद अत्यंत आवश्यक आहे. वाचनामुळे आपले ज्ञान वाढते, विचार करण्याची क्षमता विकसित होते आणि भाषेवर प्रभुत्व मिळते. चांगली पुस्तके आपल्याला योग्य दिशा दाखवतात, सकारात्मक विचार




देतात आणि आपले व्यक्तिमत्त्व घडवतात. वाचन हा केवळ छंद नसून तो आपल्या जीवनाचा आधार आहे.

या जत्रेमध्ये, सामाजिक आणि शैक्षणिक विषयांवर व्याख्याने, वाचन स्पर्धा, कथाकथन, निबंध स्पर्धा असे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालकांना नवीन लेखक, नवीन विषय आणि ज्ञानाच्या विविध क्षेत्रांची ओळख होते. शेवटी मी एवढेच म्हणेन, 'मोबाईल, आपल्याला माहिती देतो पण पुस्तके आपल्याला सखोल ज्ञान देतात.' अशा पुस्तक जत्रेचे आयोजन करून आपण बारामतीकरांना एक सुवर्णसंधी प्राप्त करून दिल्याबद्दल कमिटीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र टकले आणि सर्व कमिटी सदस्यांचे अभिनंदन करतो. आपल्या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा!!

दहावी-बारावीच्या परीक्षेनंतर कोणते अचूक करिअर निवडावे याबाबत विद्यार्थी व पालकांच्या मनात असंख्य प्रश्न आहेत? त्यासाठीच मी आपल्या भेटीला येत आहे. 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तकांची जत्रा', स्वामी विवेकानंद सभागृह, अशोक नगर, बारामती येथे दिनांक १० मे रोजी सकाळी दहा वाजता.

'करिअरवर बोलू काही', 'वेध भविष्याचा' त्यानुसार दहावी-बारावीनंतरचे करिअर निवड, बदलत्या काळानुसार वैद्यकीय अभियांत्रिकीसह सर्वच क्षेत्रांमधील करिअरची सद्यस्थिती, अचूक करिअर निवडीसाठी काय दक्षता घ्यावी आणि नेमक्या कोणत्या चुका टाळाव्यात?, करिअर यशस्वी होण्यासाठीचा कानमंत्र आणि त्यासाठीची पंचसूत्री, यावर मार्गदर्शन करण्यासाठी. तेव्हा नक्की या!



वैद्यकीय शिक्षण तसेच त्याची प्रवेश प्रक्रिया खरंच अवघड आहे काय?, आरोग्य विज्ञान शाखेतील एमबीबीएस-बीडीएससह इतर उपलब्ध अभ्यासक्रम, प्रवेशासाठीच्या परीक्षा, देशपातळीवरील व राज्यस्तरीय प्रत्येक शाखांची प्रवेश प्रक्रिया, प्रवेशासाठीची कागदपत्रे आणि शैक्षणिक सवलती तसेच आपल्या मनातील असंख्य प्रश्न, त्यांची उत्तरे जाणून घेण्यासाठी आपण मला भेटू शकता 'पुस्तकांची जत्रा' येथे दिनांक १० मे रोजी सकाळी दहा वाजता. पालकांना नम्र विनंती - पाल्याच्या निवडीमध्ये आपलाच सहभाग महत्त्वाचा असल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**- डॉ. हर्षदा शिंदे**
वैद्यकीय शिक्षण आणि करिअर कौन्सिलर

# ज्ञानमहोत्सवात सहभागी व्हा!

पुस्तकाने मस्तक सशक्त होतं अन् सशक्त मस्तक कधीही कुणापुढे नतमस्तक होत नाही... कॉलेजमध्ये असताना एका व्याख्यानात ऐकलेलं हे वाक्य खूपच आवडलं आणि पुस्तक वाचनाची आवड निर्माण झाली. पुस्तके विकत घेऊन वाचण्याची त्यावेळी परिस्थिती नसल्याने तसेच बारामतीमध्ये एक-दोन दुकाने सोडली तर पुस्तके व कादंबऱ्या मिळत नव्हत्या. त्यामुळे नामवंत लेखकांची पुस्तके वाचण्यासाठी कॉलेजची लायब्ररी हाच एकमेव पर्याय होता. त्यावेळी वाचनातून घडलेली पिढी आम्ही अनुभवली. माझ्यासारखे अनेक युवक वाचनातूनच सामाजिक चळवळींशी जोडले गेले. पुस्तकातून सामाजिक भान येत, वैचारिक प्रगल्भता येते, माणूस चिकित्सक बनतो.

परंतु पुस्तकापासून कोसो मैल दूर असणाऱ्या आताच्या पिढीला, व्हाटसअ‍ॅप व फेसबुकच्या विश्वात भरकटलेल्या पिढीला पुन्हा वाचनाकडे वळवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सध्याच्या जातीय व धार्मिक विद्वेशाच्या राजकारणाला मुळापासून उखडून टाकण्यासाठी सशक्त वैचारिक युवा पिढी तयार करणे गरजेचे आहे. 'पुस्तकांची जत्रा' ही संकल्पना त्यासाठीच टाकलेलं एक पाऊल आहे.

बारामती येथे येत्या ९ ते ११ मे दरम्यान 'क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले पुस्तकांची जत्रा' भरणार आहे. ही तीन दिवसांची साहित्यिक जत्रा वाचनप्रेमी बारामतीकरांसाठी एक मोठी पर्वणी असणार आहे. ज्ञान, संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण घडवणारा हा उपक्रम बारामतीच्या सांस्कृतिक जीवनात एक महत्वाची भर घालणारा आहे.



सावित्रीमाईंच्या नावाने होणाऱ्या या पुस्तक प्रदर्शनात विविध विषयांवरील हजारो पुस्तके एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. कादंबऱ्या, कथा, कविता, आत्मचरित्रे, इतिहास, विज्ञान, शेती तसेच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त मार्गदर्शक पुस्तके यांचा मोठा संग्रह येथे पाहायला मिळेल. या जत्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नामवंत पत्रकार, लेखक, कवी आणि साहित्यिकांना ऐकण्याची संधी साहित्यप्रेमींना मिळणार आहे. एकंदरीत, बारामतीतील हे पुस्तक प्रदर्शन व संमेलन हे केवळ पुस्तक खरेदी-विक्रीपुरते मर्यादित नसून तो एक ज्ञानमहोत्सव आहे. समाजात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी आणि बौद्धिक प्रगती साधण्यासाठी अशा उपक्रमांची गरज होती. ती या पुस्तक जत्रेच्या माध्यमातून पूर्ण होईल. त्यामुळे या तीन दिवसांच्या साहित्यिक उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन या वैचारिक चळवळीचा भाग होऊ यात.

**- अमोल काटे**
उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते

# सुलेखन कार्यशाळा

नमस्कार! मी श्रीराम मिनाक्षी अरविंद मोहिते. गेल्या दहा वर्षापेक्षा अधिक काळ मी सुलेखन क्षेत्रात कार्यरत आहे. आजच्या या एआयच्या जगात आपण हाताने लिहिणारी कला विसरत चाललो आहोत. मुलं हाताने लिहिलेली गोष्ट अधिक लक्षात ठेवतात. म्हणूनच समर्थ रामदासांनी दासबोधात अक्षरांचे महत्त्व पटवून दिले आहे. 'बाळके बाळबोध अक्षर घडसुनी करावे सुंदर देखताचि चतुर समाधान पावता।।'



विद्यार्थी दशेत शिकत असताना आपलं अक्षर कसं असावं? याचं महत्त्व या ओळी आपल्या सांगतात. बारामती येथे होणाऱ्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आपण सुलेखन कला आणि सुलेखन कलेबद्दलच्या सर्व गोष्टींवर चर्चा तसेच प्रात्यक्षिक करणार आहोत. आपण ज्यावेळी कागदावर लिहितो त्यावेळी आपल्या मनातील भाव अक्षरांच्या रूपाने कागदावर कसे उमटवू शकतो, शब्दांचा अर्थ बदलला की अक्षरे कशी बदलतात आणि आपणही हाताने लिहिलेली अक्षरं कशी सुंदर दिसू शकतात आणि आजच्या या जगातही आज सुलेखनकला नुसती टिकून नाही तर ताठ मानेने उभी आहे.

या कार्यशाळेत आपण बेसिक देवनागरी लिपीपासून अक्षरांच्या वैविध्यपूर्ण छटा कशा असतील हे पाहणार आहोत. सुंदर लिहिण्याआधी सुंदर वाचावं लागतं आणि सुंदर वाचलेलं परत सुंदर लिहावं लागतं. म्हणूनच सुलेखन कला शिकताना वाचन, मनन, चिंतन या तिन्ही गोष्टींचा विद्यार्थ्यांना फायदा होतो. सुलेखन कलेत आज उत्तम करिअर होऊ शकतं. आज जगभरात विविध ठिकाणी सुलेखन क्षेत्रात काम करणारे अनेक सुलेखनकार, चित्रकार आहेत जे सातत्याने नवनवीन प्रयोग करताना दिसत आहेत. भारतात पण सुलेखन कलेचा वापर आजकाल होताना दिसतो आहे. म्हणूनच या कार्यशाळेत सुलेखन कलेतील अशा अनेक नवनवीन गंमती जमती, अक्षरांची वेगवेगळी रूपं, त्यांचे भाव बघायला, अनुभवायला, गिरवायला मिळणार आहेत. या कार्यशाळेच्या निमित्ताने आपण पुन्हा एकदा आपल्या मराठी भाषेचा, लिपीचा जागर करूया. ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवूया, रुजवूया आणि फुलवूया.

**- श्रीराम मिनाक्षी अरविंद मोहिते**
७०५७९९४९०९

## लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा. प्रवास वर्णन, वाचलेल्या आणि भावलेल्या पुस्तकांचे परिचय, आवडलेली व्यक्तिचित्रणे आदींचे स्वागत. सोबत काही पूरक छायाचित्रे, चित्रे असतील तर तीही पाठवा. ती ज्यांच्याकडून घेतली आहेत त्यांची नावेही कळवा. निवडक साहित्यास 'चपराक'मधून प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकूर युनिकोडमध्ये खालील नंबर किंवा ई-मेलवर पाठवा.

भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# साहित्यप्रेमी समाजासाठी...



**नवनाथ वळकुंदे**
पुस्तकांची जत्रा समिती, खजिनदार
८६०००७५३०३

क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले पुस्तकांची जत्रा या प्रथम वर्ष कार्यक्रमाच्या निमित्ताने ही लेखणी प्रथमतः अवघ्या देशाच्या शिक्षण, ज्ञानाच्या ज्यांना तुम्ही आम्ही सरस्वती मानतो त्या माझ्या सावित्रीमाईस अर्पण! क्रांतिज्योती सावित्रीमाईमुळे पुस्तकांची जत्रा आपण बारामतीतमध्ये आयोजित करीत आहोत. या कार्यक्रमाच्या आयोजक समितीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र टकले, उपाध्यक्ष बापूसाहेब लोखंडे, आर. आर. मारकड पाटील हे सचिव तसेच मी स्वतः नवनाथ मनोहर वळकुंदे खजिनदार/मुख्य व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहे.

आपण हा कार्यक्रम आयोजित करण्यामागचे कारण म्हणजे ग्रामीण व शहरी भागातील युवा पिढीला जो राष्ट्रनिर्मितीचा कणा मानला जातो त्यांना वाचनाची आवड लागावी, त्यांच्या विचारांमध्ये प्रगल्भता यावी, त्यांची आयुष्यातील दिशा स्पष्ट व्हावी यासाठी हा कार्यक्रम घेत आहोत. वाचन, लेखन अन पुस्तक यांचे सानिध्य अतिशय गरजेचे आहे कारण पुस्तक म्हणजे? मन, मेंदू, मस्तक यांचा विकास घडवून आणणारे एक प्रभावी शस्त्र आहे. जे कोणतेही शस्त्र हातात न घेता क्रांती घडवून आणण्याचे एक प्रभाव हत्यार आहे. जो पुस्तकांच्या सानिधन्यात तो जीवनात यशस्वी अन् आनंदी! यासाठी पुस्तकांवर प्रेम करा, त्यांना आपला मित्र बनवा आणि स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास करून या पुस्तक नावाचा मित्र बनवा कारण हा पुस्तक नावाचा मित्र आपल्याशी नेहमी सत्य बोलतो. सत्य माहिती आपल्यापर्यंत पोहोचवतो.'हा कार्यक्रम ९, १० आणि ११ मे असा तीन दिवसांचा असणार आहे. ९ तारखेला कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच भारतीय जनता पक्षाचे राज्यसभा खासदार मा. रामराजे वडकुते साहेब हे देखील ९ मे रोजी उपस्थित असणार आहेत. त्या दिवशी सकाळच्या सत्रामध्ये अक्षर वाचन, खेळ मुलांचा, व्यक्तिमत्त्व विकास या विषयीचा कार्यक्रम रसिका उपळेकर ज्या सह्याद्री वृत्तवाहिनीला निवेदिका म्हणून काम पाहतात त्या आणि अक्षय उपळेकर सादर करतील. त्यानंतर ११ वा प्रसिद्ध चित्रकार श्रीराम मोहिते यांचा अक्षर सुधारण्यासाठी व स्वच्छ, सुंदर अक्षर कसे काढावे ते शिकवणारी सुलेखन कार्यशाळा पार पडेल.

लोकशाही आणि देश यांचा कसा संबंध आहे यासाठी देखील परिसंवाद ९ मे रोजी सायंकाळी आयोजित केला आहे. कार्यक्रमाचा विषय 'आजची लोकशाही उद्याचा भारत देश' हा आहे. ज्येष्ठ इतिहासकार आणि संशोधक संजय सोनवणी हे या विषयावर त्यांचे मत कार्यक्रमातून व्यक्त करणार आहेत. तसेच या पुस्तक जत्रेत ज्यांनी समाजासाठी आपले आयुष्य खर्ची केले अशा तीन मान्यवरांना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रा. विठ्ठल कांगणे, ॲड. राहुल मखरे व 'चपराक प्रकाशन'चे संपादक, प्रकाशक घनश्याम पाटील यांचा समावेश असेल. यावेळी 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या, सावित्रीबाई फुले १८५४ साली लिहिलेल्या 'काव्यफुले' या कवितासंग्रहाचे प्रकाशन या कार्यक्रमाचे देखील मुख्य आकर्षण असणार आहे. यात कवितांचे सादरीकरण देखील वेगवेगळ्या कवींच्या माध्यमातून होणार आहे. या कवींमध्ये नितीन चंदनशिवे, हनुमंत चांदगुडे, प्रशांत केंदळे, राजेंद्र सोमवंशी आदींचा समावेश असल्याने कवितांची मैफिल चांगलीच रंगेल, याचा आयोजक या नात्याने विशेष आंनद होत आहे.

१० मे रोजी स्वतः शरदचंद्र पवार साहेब कार्यक्रमाला हजेरी लावणार आहेत तसेच माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर, कर्जत-जामखेडचे विद्यमान आमदार रोहित पवार हे देखील उपस्थित असणार आहत. त्यामुळे आयोजक म्हणून आमची देखील जबाबदारी वाढलेली आहे, हे मात्र नक्की! क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक जत्रा हा कार्यक्रम अतिशय आंनददायी व उत्साहाने पार पडेल यात तीळमात्र शंका वाटत नाही. ११ मे ला सकाळी १० वा बालभारती अभ्यासमंडळाचे सदस्य आणि राज्य अभ्यासक्रम पुनर्रचना समितीचे सदस्य संदीप वाकचौरे यांचे 'शिक्षणाच्या वाटा' या विषयावर विशेष व्याख्यान आहे. ते आपल्या अनुभवातून अतिशय चांगल्या प्रकारे शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगतील, याचे देखील विशेष आकर्षण वाटत आहे. कार्यक्रमाची सायंकाळ एका आगळ्या वेगळ्या, विशेष महत्त्वपूर्ण अशा नाटकाच्या सादरीकरणाने होणार आहे. नाटक सादरकर्ते डॉ. सोमनाथ मुटकुळे हे आहेत. त्यांचे राज्यभर असंख्य नाट्यप्रयोग झालेले आहेत. त्यांच्या नाट्यप्रयोगाचे असंख्य चाहते महाराष्ट्रभर आहे, हे देखील कौतुकाने नमुद करावेसे वाटते. त्यांचा एकपात्री नाट्यप्रयोगाचा विषय हा आपल्या क्रांतिज्योती सावित्रीमाईंना मानवंदना म्हणून की काय कार्यक्रमाचा विषय 'पुन्हा क्रांतिज्योती' हा आहे, हे देखील या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य! या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने लोक, विद्यार्थी उपस्थित राहतील आणि असंख्य वाचक देखील घडतील, याचा विश्वास वाटतो. या कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि साहित्यप्रेमी बनविण्याचा क्रांतिज्योती पुस्तकांची जत्रा या समितीचा मानस नक्कीच पूर्ण होईल, हे ही तितकेच खरे!

कलाफुलवा

## नाट्य अनुभव कार्यशाळा

या कार्यशाळेतून मुलांना नाट्यकला या सर्वांगसुंदर कलाप्रकाराची तोंडओळख करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कार्यशाळेत आम्ही नाटकाचे महत्त्व, ते सादर करण्याकरता महत्त्वाचं असलेलं वाचन, कथा, कादंबरी, ललित, कविता यामध्ये सामावलेलं नाटक यासारख्या विषयांची मुलांशी ओळख करून देऊ.





नाट्यकलेचा व्यक्तिमत्त्व विकासासाठी असणारा उपयोग अधोरेखित करत रंगमंचावर सादर होणारं आणि त्यापल्याड आपली साथ करणारं नाटक मुलांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**– अक्षय आणि रसिका उपळेकर**

# पुन्हा क्रांतिज्योतीच्या वाटेने जाताना...



**डॉ. सोमनाथ मुटकुळे**
संगमनेर, ९८२२८१३७८४

**नमस्कार मंडळी,**

तुम्हाला या छोट्याशा लेखातून भेटताना मनस्वी आनंद होत आहे कारण मी आपल्यासमोर पुन्हा क्रांतिज्योती-सावित्रीचा एकपात्री प्रयोग दिनांक ११ मे रोजी बारामती येथे पुस्तक जत्रा या कार्यक्रमात सादर करत आहे. ज्याचे आजपर्यंत लहान-मोठे ५०० च्या पुढे प्रयोग झालेत.

खरे तर १९८९ साली क्रांतीबा जोतीराव फुलेंच्या शताब्दी वर्षात महाराष्ट्रातील फुले दांपत्यावरील मी लिहून दिग्दर्शित केलेले पहिले 'असुड' हे नाटक संगमनेर येथे सादर झाले, ज्या प्रयोगासाठी सन्मा. नानासाहेब गोरे, भाई वैद्य, दादासाहेब रुपवते, बाबा आढाव, दादासाहेब रुपवते, कॉ. दत्ता देशमुख, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्यासह अनेक मान्यवर व प्रचंड संख्येने जनसमुदाय उपस्थितीत होता.

त्यानंतर 'संग्राम संगमनेर' या संस्थेच्या माध्यमातून ५० प्रयोग व स.न. प्र. या संस्थेने महाराष्ट्रभर जवळपास १००च्या पुढे प्रयोग केले पण पुढे कलाकारांचा मोठा संच व आर्थिक नियोजन आणि नाट्यक्षेत्राला आलेली मरगळ, समाजाची उदासीनता यामुळे हे प्रयोग नाइलाजास्तव आम्हाला बंद करावे लागले परंतु नसानसात भिणलेलं फुले दांपत्यांच्या विचारांचे रक्त शांत बसू देत नव्हते. वर्तमानातील विषम व्यवस्था 'छाताडावर' बसून दम घुटवत होती आणि तो श्वास मोकळा करण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीचा जन्म झाला. १९९० पासून याचे आजपर्यंत ५०० च्या पुढे प्रयोग सादर झालेले आहेत. विशेषतः जिथे अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, दारिद्र्य, बेकारी, बुवाबाजी आणि धर्मांधता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी अनेक प्रश्नांची पराकोटीची आजची झालेली अवस्था पाहता या प्रयोगाचे जास्तीत जास्त प्रयोग आम्ही ग्रामीण भागात केले. ग्रामीण भागात जसा हा प्रयोग पोहोचतो तसा तो शहरी भागातही अनेक मान्यवरांच्या व मध्यमवर्गाच्या गळी उतरवला गेला.

इतिहासाची मांडणी करताना वर्तमान व भविष्याचा वेध घेत हा एकपात्री प्रयोग समग्र परिवर्तनाची हाक देतो. त्यात कुठलीही तडजोड करत नाही. 'सत्य-असत्याशी मन केले ग्वाही नाही जुमानीले जनमता' या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे कुठल्याही परिस्थितीत, कुठलाही प्रसिद्धीचा सोस न ठेवता प्रयोग करत राहिलो, करत आहे.




प्रयोग इतका लवचिक आहे की ज्या ठिकाणी हा प्रयोग होईल त्या ठिकाणचे तात्काळ असणारे प्रश्न या प्रयोगात मांडताना फुले दांपत्यांच्या विचारांशी हा प्रयोग सांगड घालतो. कधी नव्हे ते २१व्या शतकात, सर्व स्तरावरील विषमता पाहता हा समत्त्वाचा लढा हा या महात्म्यांच्या विचारांतून कसा चालवता येईल हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून फुले दांपत्यांचे जीवन चरित्र, त्यांचा संघर्ष व मूल्ये नकळत प्रयोगातून पेरले जातात. त्यात पोवाडा, लोकगीतांची फोडणी देत प्रबोधनाबरोबर जागृती होऊन जन माणसांना निश्चित विचार करण्यास हा प्रयोग प्रवृत्त करतो, असा माझा अनुभव आहे. या प्रयोगाबरोबरच खेळ मांडीयेला (संत तुकाराम), राजर्षी (शाहू, फुले, आंबेडकर एकत्र), राज्य रयतेचे व्हावे (छत्रपती शि. महाराज), ...खतरे में है... या नाटकांचे प्रयोग शांती फाउंडेशन या संस्थेतर्फे सादर होत आहेत. या सर्वच सामाजिक चळवळींची ही सर्व नाटके 'चपराक'चे प्रकाशक सन्माननीय घनश्यामजी पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी व चित्रपट गीतकार ज्योतीताई पाटील यांनी या नाटकांचे प्रकाशन करून समत्वाचे विचार महाराष्ट्रभर पेरण्याचे काम केले आहे.

चला तर, भेटूया! बारामतीत ११ मे २०२६ ला! 'चपराक' प्रस्तुत, शांती फाउंडेशन निर्मित, 'पुन्हा क्रांतीज्योती सावित्री!'

**साहाय्यक : श्री. सूर्यकांतजी शिंदे, श्री. प्रवीण घुले, श्री. संदीपजी वाकचौरे**

**सुप्रसिद्ध नाट्यलेखक आणि अभिनेते डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची ज्वलंत विषयांवरील नाटकांची धगधगती पुस्तके आपण 'चपराक'च्या www.chaprak.com या वेबसाईटवरून घरपोच मागवू शकाल.**

sanskrutiprakashan@yahoo.com
www.sanskrutiprakashan.com
॥ ॐ नमः शिवाय ॥

# संस्कृती प्रकाशन

संस्कृती प्रकाशन

## ग्रंथदालन

६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, नु.म.वि.जवळ, पुणे ३० । मो. ९८२३०६८२९२ । फो. ०२० २४४९७३४३

जगातल्या सर्व राजांनीही कौतुकांनी निरखावं, जगातल्या सर्व राज्यकर्त्यांनी साक्षेपानं अभ्यासावं नि जगातल्या सर्व विचार साधकांनी सतत स्मरावं असं दैदिप्यमान व्यक्तिमत्व म्हणजे श्री छत्रपती शिवराय! हजारो पानं लिहिली तरी ती अपुरीच पडतील असं हे लोकोत्तर व्यक्तिमत्व! त्याची सकळ गाथा सुरू करावी कुठून आणि संपवावी कोठे असा पेच भल्याभल्यांना पडतो. त्यातून ना इतिहासकार सुटले ना बखरकार.
मात्र शिवप्रभुंच्या तेजानं दिपून गेलेल्या नि त्यांच्या चिंतनात आपलं अवघं आयुष्य व्यतीत केलेल्या शिवभक्त श्री. काशिनाथ मढवी ह्या इतिहास-अभ्यासकाराने एक सरळ सोपा मार्ग निवडला आणि तो म्हणजे,पुस्तकाच्या माध्यमातून श्री शिवरायांच्या १०० गुणांचा हा महापट वाचकांसमोर मांडण्याचा!
श्री छत्रपती हे जगातील सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ राजे कसे हे विशद करण्यासाठी श्री. काशिनाथ मढवी यांनी शिवरायांच्या अद्वितीय इतिहासातून, त्यांच्या १०० लोकविलक्षण वैशिष्ठ्यांची यादीच वाचकांसमोर सादर केलीय आणि शिवप्रभुंच्या लखलखत्या इतिहासाची सोनेरी पानं जक्षासमोर ठेवलीत.
आपला अभ्यास नि व्यासंग पणाला लावून ह्या शिवभक्ताने, सर्व शिवप्रेमींना आणि विचक्षण वाचकांना, ह्या ग्रंथाच्या रूपानं आणखी एक ऐतिहासिक दस्तावेज बहाल केला आहे. अखिल भारतवर्षाच्या लाडक्या अशा शिवबाच्या असामान्य कर्तृत्वाचे पैलू पुन्हा पुन्हा चाळवे, अभ्यासावे, स्मरावे नि लक्षात ठेवावे असा हा वेगळा ग्रंथप्रयत्न! असा वेगळा ग्रंथ साकार करण्याची दृष्टी देणाऱ्या, लाखांच्या पोशिंदा ठरलेल्या श्री छत्रपतींच्या तेजस्वी रूपाला पुन्हा पुन्हा विनम्र अभिवादन नि त्याची ही श्रध्देय ग्रंथपूजा बांधणाऱ्या श्री. काशिनाथ मढवी यांनाही सलाम!

जगातील सर्वोत्तम राजा छत्रपती शिवाजी महाराज!
मराठी माणसाला पडलेलं एक स्वप्न! हो स्वप्नच!
ज्यांचा इतिहास वाचून अंगात स्फूर्ती येते, मन भारावून जाते, डोळे डबडबतात.
विश्वाच्या पसाऱ्यात एक टिंब ओळख असणारा आपला शुद्र जीव अचानक मोठा होतो. काय कारण असावं?
शिवाजी महाराजांच्या नजरेखातर, शब्दांशिवाय
प्राण द्यायला हसतमुखाने तयार असणारे मावळे, हंबीरराव मोहिते, तानाजी मालुसरे, शिवा काशिद, बाजी प्रभू देशपांडे, बहिर्जी नाईक...
किती नावे घ्यावीत? सगळी केवढी डोंगराएवढी माणसे!...
मराठ्यांच्या इतिहासातील हे सुवर्णपान!
यांचा इतिहास वाचला तरी महानतेचा साक्षात्कार होतो.
कुठून येत होती ती उर्मी? मृत्यूला सहजपणे कवटाळणे?
ते करत असतानाही 'राजं, मुजरा' म्हणत आलेले समाधानाचे मरण!
एक ना दोन, अशी कितीतरी रत्न स्वराज्यात होती.
त्यांची चरित्रे वाचली तरी अचंबित व्हायला होते.
जशी एक तरी ओवी अनुभवावी, तसे एक तरी चरित्र वाचावे.
इतिहासाच्या उजेडात वर्तमान स्पष्ट होतो.
भविष्यकाळाची वाट बनत जाते, म्हणून इतिहास वाचायला हवा.
असेच महत्त्वाचे पुस्तक म्हणजे हनुमंत पवार यांनी लिहिलेले 'स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते'
हे पुस्तक म्हणजे असेच मानाचे पान!
इतिहासातील खंबीर, पराक्रमी तितकेच हळवे व्यक्तिमत्व!
नात्याच्या गुंत्यात न अडकता सत्याची बाजू घेणारे सरलष्कर!
त्यांचा देदिप्यमान इतिहास वाचताना, त्यांची आभाळाएवढी उंची मोजताना,
जीव सुपाएवढा होतो.

धन्य ते छत्रपती ...
धन्य ते हंबीरराव...

– सुनिताराजे पवार
मा. कोषाध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## जगातील सर्वोत्तम राजा छ.शिवाजीमहाराज

काशिनाथ मढवी

## स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते

प्रा.हणुमंतराव पवार

मूल्य : ४३० रु.




लवकरच
प्रकाशित होत आहे...

## अ जर्नी ऑन दि परफेक्ट ट्रॅक




रेल्वेत अभियंता होणं आणि राष्ट्राची सेवा करणं ही निश्चितच गौरवाची आणि अभिमानाची बाब म्हणावी लागेल. हे यश साध्य करतानाच आपल्याशी संबंधित सर्वांच्याच आणि आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या भल्याचाच विचार करणं म्हणजे तर दुर्मीळात दुर्मीळ बाब म्हणावी लागेल.
**डॉ. शरद टेंभेकर** यांनी ही किमया साधली आहे. म्हणूनच ते म्हणतात, माझ्या आयुष्यात संघर्ष असा कधी आलाच नाही. मला सगळी चांगलीच माणसं भेटली!
अशा सुखी माणसाचा सदरा परिधान केलेल्या या सुहृदय अभियंत्याची ही गौरव गाथा नक्की वाचा...

चपराक प्रकाशन
www.chaprak.com
ईमेल : info@chaprak.com
वेबसाईट : www.chaprak.com

भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०

हक्काची माणसं हक्काचं नेतृत्व
वहिनींच्या हाती
विकासाचं कर्तृत्व



सुनेत्रावहिनी
अजितदादा पवार
यांचे
**हार्दिक अभिनंदन**



शुभेच्छुक



विश्वास देवकाते उर्फ नाना पाटील
माजी जिल्हा परिषद अध्यक्ष

संदीप बांदल
तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस बारामती

# सोशल मीडियाची खोटी प्रतिष्ठा



आदित्य पुण्यातल्या एका मध्यमवर्गीय कुटुंबातला मुलगा. इंजिनिअरिंग पूर्ण करून तो एका आयटी कंपनीत कामाला लागला होता. घरची परिस्थिती ठीकठाक होती, मित्रमंडळी होती आणि आयुष्य अगदी साध्या पण समाधानाच्या वाटेवर चाललं होतं. एक दिवस त्याच्या आयुष्यात सोशल मीडियाने अशी एंट्री घेतली की त्याचं जगच बदललं. सुरुवातीला आदित्य फक्त वेळ घालवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करायचा. ऑफिसनंतर थोडा रिलॅक्स व्हावं म्हणून तो फोटो पाहायचा, मित्रांचे अपडेट्स बघायचा पण हळूहळू त्याच्या लक्षात येऊ लागलं की सोशल मीडियावर लोकांचं आयुष्य खूपच 'परफेक्ट' दिसतंय! कुणी विदेशात फिरतंय, कुणी महागड्या गाड्या घेतोय, कुणी दर आठवड्याला नवीन रेस्टॉरंटमध्ये जेवतोय तर कुणी फिटनेस, फॅशन आणि लाईफस्टाईलमध्ये खूप पुढे गेलाय.



**मयूर बागुल**
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

**लघुकथा**

एके दिवशी त्याने आपल्या कॉलेजमधल्या मित्राचा फोटो पाहिला. तो दुबईत उभा होता, मागे उंच इमारती आणि कॅप्शन होतं "Living my dream life." आदित्यच्या मनात काहीतरी हललं. त्याला वाटलं मी काय करतोय? माझं आयुष्य इतकं साधं का आहे? त्या दिवसापासून आदित्य सोशल मीडियावर फक्त पाहणारा राहिला नाही तर स्वतःला 'दाखवणारा' झाला. सुरुवातीला त्याने चांगले कपडे घालून फोटो काढायला सुरुवात केली. मग कॅफेमध्ये जाऊन फोटो, जिममध्ये सेल्फी, ऑफिसच्या मीटिंग रूममध्ये 'वर्किंग हार्ड' अशा पोस्ट्स. लाईक्स वाढू लागले. लोक कमेंट करायला लागले, भारी!, जबरदस्त!, प्राऊड ऑफ यू! त्याला एक वेगळाच आनंद मिळू लागला.

पण हळूहळू त्याच्या पोस्ट्स खऱ्या आयुष्यापासून दूर जाऊ लागल्या. त्याने एकदा मित्राची महागडी कार घेऊन फोटो टाकला आणि कॅप्शन दिलं, "Finally bought my dream." त्या पोस्टवर हजारो लाईक्स आले. त्याला वाटलं हीच खरी प्रतिष्ठा आहे. यानंतर त्याने हॉटेलमध्ये जाऊन फक्त फोटोसाठी जेवण मागवलं पण खाल्लंच नाही. फक्त फोटो टाकण्यासाठी ट्रिप प्लॅन केली पण तिथे आनंद घेण्याऐवजी फोटो काढण्यात वेळ घालवला. त्याचं आयुष्य आता जगण्यासाठी नव्हतं तर दाखवण्यासाठी झालं होतं. त्याच्या खऱ्या मित्रांना मात्र काही तरी बदल जाणवत होता. पूर्वी साधा राहणारा आदित्य आता सतत फोनमध्ये गुंतलेला असायचा. कुणाशी नीट बोलत नव्हता. आई-वडिलांबरोबर वेळ घालवणं कमी झालं होतं. घरी जेवायला बसताना सुद्धा तो फोटो काढायचा आणि मगच जेवायचा. त्याच्या वडिलांनी एकदा विचारलं, "तू आनंदी आहेस ना?" आदित्यने लगेच उत्तर दिलं, "हो ना बाबा, बघा ना, किती लोक मला फॉलो करतात."

वडिलांनी शांतपणे विचारलं, "पण खऱ्या आयुष्यात तुला किती लोक समजतात?"

तो प्रश्न आदित्यच्या मनात रेंगाळत राहिला पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केलं. सोशल मीडियावर प्रतिष्ठा टिकवण्यासाठी त्याने खर्च वाढवला. क्रेडिट कार्ड वापरून महागडे कपडे घेतले, फोन बदलला, जिमची महागडी मेंबरशिप घेतली. बाहेरून तो यशस्वी दिसत होता पण आतून ताण वाढत होता. एका दिवशी त्याच्या पोस्टवर कुणीतरी कमेंट केली, फेक लाइफ! ती एकच ओळ त्याला खूप लागली. त्याने लगेच त्या व्यक्तिला ब्लॉक केलं पण मनात अस्वस्थता निर्माण झाली. लोक असं का म्हणतात? मी इतका प्रयत्न करतोय! त्याला आता प्रत्येक पोस्टवर जास्त लाईक्स हवेत होते. कमी लाईक्स आले की त्याचा मूड खराब व्हायचा. तो स्वतःची तुलना सतत इतरांशी करू लागला. एकदा त्याने पाहिलं त्याचाच एक मित्र खूप मोठ्या कंपनीत जॉईन झाला होता. त्याच्या पोस्टवर हजारो कमेंट्स होत्या. आदित्यने लगेच एक पोस्ट टाकली "Big announcement coming soon.' खरं तर काहीच नव्हतं. तो फक्त लोकांचं लक्ष वेधून घ्यायचा प्रयत्न करत होता पण काही दिवसांनी सत्य समोर आलं. त्याच्या ऑफिसमध्ये प्रोजेक्टमध्ये चूक झाली आणि त्याच्यावर ताण वाढला. कामात लक्ष न देता तो सोशल मीडियात गुंतलेला होता. शेवटी त्याची परफॉर्मन्स रिव्ह्यू खराब झाली. त्याच वेळी बँकेकडून कॉल आला क्रेडिट कार्ड बिल बाकी होतं. तो तणावात गेला पण सोशल मीडियावर मात्र तो अजूनही 'हॅपी लाइफ' दाखवत होता. एके दिवशी त्याच्या आईने त्याला विचारलं, "तू खरोखर आनंदी आहेस का? की फक्त दाखवतोयस?" त्या प्रश्नाने त्याचं मन तुटलं. त्या रात्री तो पहिल्यांदाच शांत बसला आणि स्वतःकडे पाहिलं. त्याने लक्षात घेतलं त्याचं खऱ्या आयुष्याशी नातंच तुटलं होतं. जे मित्र खरे होते, त्यांच्याशी संवाद कमी झाला होता. कुटुंबापासून तो दूर गेला होता आणि जे लोक त्याला लाईक्स देत होते, ते त्याच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने कुठेच नव्हते. दुसऱ्या दिवशी त्याने एक वेगळी पोस्ट टाकली. त्यात कोणताही फिल्टर नव्हता, कोणतीही दिखाऊ कॅप्शन नव्हती. फक्त एक साधा फोटो घरच्या गच्चीवर बसलेला, आईसोबत चहा घेताना. कॅप्शन होतं, 'खरं आयुष्य इथे आहे.' त्या पोस्टवर लाईक्स कमी होते पण कमेंट्स वेगळ्या होत्या. 'खूप छान. हेच खरं. स्वतःसारखा राहा.' आदित्यला जाणवलं सोशल मीडियावर मिळणारी प्रतिष्ठा ही फक्त आभासी असते. ती क्षणिक असते! पण खऱ्या आयुष्यात मिळणारा विश्वास, प्रेम आणि नातेसंबंध हे कायम टिकणारे असतात. त्याने हळूहळू सोशल मीडियाचा वापर कमी केला. खऱ्या आयुष्यातल्या लोकांशी पुन्हा संवाद सुरू केला. खर्चावर नियंत्रण आणलं. आणि सर्वात महत्त्वाचं स्वतःशी प्रामाणिक राहायला सुरुवात केली. आजही तो सोशल मीडियावर आहे पण आता तो दाखवण्यासाठी जगत नाही. तो जगतो आणि जे खरं आहे तेच दाखवतो; कारण त्याला कळलं आहे, खोटी प्रतिष्ठा चमकते पण टिकत नाही. खरी ओळख शांत असते पण आयुष्यभर साथ देते!!

# सावित्रीबाई फुले पुस्तक जत्रेची रूपरेषा

## शनिवार, दिनांक ९ मे २०२६

**-: पहिले सत्र :-**

उद्घाटक - **सुनेत्राताई पवार,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**-: दुसरे सत्र :-**

सकाळी दहा वाजता

**विषय : वाचन आणि व्यक्तिमत्व विकास**

सादरकर्ते : अक्षय आणि रसिका उपळेकर

**-: तिसरे सत्र :-**

सकाळी अकरा वाजता

**सुलेखन कार्यशाळा**

श्रीराम मोहिते, कोल्हापूर

**-: चौथे सत्र :-** :

संध्याकाळी सहा वाजता

**मुलाखत : संजय सोनवणी**

सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक

मुलाखतकार - घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन

## रविवार, दि. १० मे २०२६

**-: पहिले सत्र :-**

सकाळी दहा वाजता

**विषय : दहावी-बारावीनंतर पुढे काय?**

हेमचंद्र शिंदे, करिअरतज्ज्ञ

**-: दुसरे सत्र :-**

११ वाजता :

**विषय : वैद्यकीय शिक्षण आणि प्रवेश प्रक्रिया**

डॉक्टर हर्षदा शिंदे

**-: तिसरे सत्र :-**

संध्याकाळी सहा वाजता

**पुरस्कार वितरण सोहळा**

**हस्ते : शरदचंद्रजी पवार साहेब**

**समाजभूषण पुरस्कारासाठी निवडलेले सन्माननीय**

**१) घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन २) अॅड. राहुल मखरे ३) प्रा. विठ्ठल कांगणे**

**सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्यफुले' या कवितासंग्रहाचे प्रकाशन**

**प्रमुख उपस्थिती : आमदार मा. रोहित पवार, आमदार मा. उत्तम जानकर,**

**मा. युगेंद्र पवार,** खजिनदार, विद्या प्रतिष्ठान

**-: चौथे सत्र :-**

सायंकाळी सात वाजता

**कवितांची मैफिल**

**सहभाग : नितीन चंदनशिवे, प्रशांत केंदळे, राजेंद्र सोमवंशी, हनुमंत चांदगुडे, दिनेश आदलिंग**

## सोमवार, दि. ११ मे २०२६

**-: पहिले सत्र :-**

**व्याख्यान : विषय - शिक्षणाच्या वाटा**

**संदीप वाकचौरे, बालभारती अभ्यास मंडळ सदस्य**

**-: दुसरे सत्र :-**

**संध्याकाळी सात वाजता**


**पुन्हा क्रांतिज्योती, एकपात्री नाट्यप्रयोग**

**सादरकर्ते : डॉ. सोमनाथ मुटकुळे, संगमनेर**

# भीतीयुक्त प्रार्थना परमेश्वरापर्यंतचा प्रवास नाही



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




**माणसाच्या आयुष्यात धर्माचे स्थान अनन्यसाधारण असे राहिले आहे. धर्माचा विचार केवळ आपल्या भूमीत केला जातो असे नाही. जगाच्या प्रत्येक भूमीत धर्माचा विचार आहे. अनेक समाजमनावर धर्माने गारूड केलेले आहे. धर्म ही गोष्ट माणसाच्या जीवनातून वजा केली तर जगता येईल का? असा प्रश्न केला तर अनेकांचे उत्तर 'नाही' असे येते. धर्माच्या नावाखाली विविध परंपरा, रूढींचे समर्थन केले जाते. धर्माचा विचार मानवी व समाज परिवर्तनाची वाट म्हणून किती केला जातो, हा खरा प्रश्न आहे. मुळात धर्म जणू अपरिवर्तनशील असतो अशीच धारणा विकसित केली जात आहे. धर्म हा माणसाच्या उन्नतीसाठीचा विचार आहे. आपल्या जीवनात धर्माचा विचार उन्नत, सुख, समाधान, आनंदासाठी आहे. धर्माच्या विचाराने माणसं सुखी व्हायला हवीत.**

धर्म म्हणजे प्रेम हा विचार व्हायला हवा मात्र धर्माच्या मूळ धारणेपासूनचा कोणताच विचार अलीकडच्या काळात केला जात नाही. धर्माचे झेंडे माणसांमध्ये भेद निर्माण करत आहेत. धर्माच्या नावाखाली आपण ज्या वाटा चालत आहोत, त्या वाटांचा प्रवास जीवनाची उन्नतीची वाट दाखवणारी नाही हे लक्षात घ्यायला हवे. धर्म म्हणजे झेंडे आणि त्यांचा रंग नाही तर वर्तमानात मानवी भेदाभेदासाठी धर्माचा विचार केला जाऊ लागला आहे. जो धर्म माणसांच्या मनात भेदाभेद निर्माण करतो तो धर्म खोटा आहे. धर्म ही जीवन प्रणाली आहे. धर्म म्हणजे प्रेम आहे हे लक्षात घ्यायला हवे. आज धर्माच्या नावाखाली भीती निर्माण होते आहे. धर्म जर भीतीतून निर्माण होत असेल तर तो धर्म खोटा आहे. प्रेमाची वाट म्हणून धर्माकडे पाहण्याची गरज आहे. धर्माबद्दलचा विचार म्हणून भगवान ओशो यांनी सांगितलेली गोष्ट बरेच काही सांगून जाणारी आहे.

ओशो म्हणतात की, अशी एक घटना मी ऐकलेली आहे. त्याकाळी युद्ध सुरू असायची. तेव्हा ते युद्धाचे दिवस होते. अचानक वस्तीवस्तीवर बॉम्ब हल्ले होऊ लागले होते. अनेक ठिकाणी बॉम्ब पडू लागले होते. अशावेळी एका निर्जन रस्त्याने एक धर्म-पुरोहित कुठे तरी चालला होता. तो स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होता. धावत,धावत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्याने जवळच्याच एका लांडग्यांच्या गुहेत आश्रय घेतला. तो गुहेत शिरला आणि पाहतो तो एक सैनिक अधिकारी आधीच त्या गुहेत लपून बसलेला त्याला दिसला. या नव्या आगंतुकाला जागा देण्यासाठी तो सैनिक अधिकारी बाजूच्या कोपऱ्यात सरकला. आता आपण आत अधिक सुरक्षित आहोत अशी त्यांची भावना झाली मात्र त्यांच्या दुर्दैवाने आता तर गुहेच्या जवळपास बॉम्ब पडू लागले होते. त्या हल्ल्याचे आवाज ऐकून पुरोहिताचे हातपाय चांगलेच कापू लागले होते. मनात मृत्युची भीती निर्माण झाली होती. आपण सुरक्षित राहू म्हणून गुहेत प्रवेश केला मात्र येथेही सुरक्षित राहण्याची शक्यता नाही असे त्याला वाटले होते. स्वतःचा जीव वाचला जावा म्हणून त्याने गुडघे टेकून परमात्म्याची प्रार्थना सुरु केली. जोरजोरात तो प्रार्थना करू लागला. मधूनच डोळे उघडून त्याने पाहिले. तो सैनिक अधिकारी देखील त्याच्याप्रमाणेच जोरजोरात प्रार्थना करू लागला होता.

बॉम्बहल्ला थांबल्यानंतर धर्मपुरोहिताने सैनिकी अधिकाऱ्याला विचारले, ''बंधुराज, मी पाहिले की, आपण देखील माझ्यासारखी परमेश्वराची प्रार्थना करीत आहात.''

तो सैनिक अधिकारी म्हणाला, ''महानुभाव, लांडग्यांच्या गुहेत नास्तिक कोण राहील?'' तुम्ही देखील कोणत्या तरी भयाच्या पोटीच भगवानाचा शोध करीत नाही का? तुमच्या प्रार्थना भीतीवरच आधारलेल्या नाहीत काय? एक लक्षात ठेवा, भीतीवर आधारलेला धर्म सत्य धर्म नव्हे. भयभीत आस्तिकापेक्षा भयशून्य नास्तिक मी अधिक पसंत करीन; कारण भीतीने भगवंतापर्यंत पोहचणे असंभवनीय आहे. आज परमेश्वराची प्रार्थना जी होते आहे त्या प्रार्थनेच्या मुळाशी भीती हेच कारण आहे. त्यामुळे भीती मनात ठेवून केलेली कोणतीही प्रार्थना तुम्हाला परमेश्वरापर्यंत पोहोचवण्यास मदत करणारी ठरणारी नाही.

मुळात धर्माचा अर्थ आहे, सत्याचा प्रवास. धर्म म्हणजे सत्य. सत्य हे नेहमीच निर्भय असते. मग सत्याची वाट चालायची आहे आणि त्यातही सत्य हे जर भीतीच्या वाटेने जाणार असेल तर ती वाट धर्मापर्यंत जाणार नाही आणि ती वाट परमेश्वरापर्यंत पोहोचवण्यास मदत करणारी असू शकणार नाही. आपल्याला सत्याची वाट चालायची असेल किंबहूना सत्यप्राप्तीची पहिली अट अभय हिच आहे. अगदी आपण विचार करून पाहिले तर भय कधी प्रेम बनू शकेल काय? आणि भय प्रेम बनू शकत नाही तर मग प्रार्थना कशी बनेल? कारण प्रार्थना म्हणजे प्रेमाची पूर्णता परंतु मनुष्यानं बांधलेल्या साऱ्या मंदिरांच्या पायामधे भीतीच्या विटा आहेत. भीतीमुळेच भगवानाची मूर्ती घडलेली आहे. आपल्या मनात देवाचे जे स्थान आहे किंवा भीतीच्या भावनेतूनच भगवान निर्माण झाला आहे. त्यामुळे आपले सारं जीवन काही असत्य बनलं आहे कारण ज्यांचा भगवानच मुळी असत्य, त्यांचे इतर काय सत्त्य असणार? आणि ज्यांचे प्रेम असत्य, ज्यांची प्रार्थना असत्य त्यांचे प्राणही असत्य झाले तर आश्चर्य कोणते? प्रेमामुळे-केवळ प्रेमामुळेच प्रार्थना सत्य ठरते आणि ज्ञानामुळे केवळ ज्ञानामुळेच जो वस्तुतः आहे त्याला-परमात्म्याला जाणता येतो. माझं सांगणं आहे की प्रेम करा कारण गहिऱ्या प्रेमाने जीवनाची परिणती प्रार्थनेमध्ये होते. माझे सांगणे आहे की स्वतःच्या प्रज्ञेला जागृत करा कारण प्रज्ञेची जागृती म्हणजे परमात्म्याचं दर्शन आहे. प्रेम आणि प्रज्ञा हे दोन मूलमंत्र ज्याला समजले त्याला जे समजणे जरूरीचे आहे, समजण्याच्या योग्यतेचे आहे आणि जे समजू शकते ते सर्व काही समजते. परमात्म्याचे मंदिर कुठे आहे असा प्रश्न कुणी मला विचारला, की मी सांगतो प्रेम आणि प्रज्ञा यामध्ये निश्चितच प्रेम म्हणजे परमात्मा! प्रज्ञा म्हणजे परमात्मा!

आपल्या समाजात जी माणसं प्रज्ञावान आहेत, ती माणसं अधिक आस्तिक आहेत पण त्यांचा धर्म हा खोट्याच्या मार्गाचा नाही त्यांचा धर्म जीवन प्रवासात सत्याची वाट चालणारा आहे. त्यामुळे जीवनात आपल्याला धर्म हवा असेल तर मनातील परमेश्वराच्या प्रार्थनेची वाट चालायची असेल तर मनापासून भीतीची वाट बंद करायला हवी. निर्भयता, विवेक, शहाणपणाची वाटच परमेश्वरापर्यंत पोहोचण्याची आहे. हे लक्षात घेऊन आपण प्रज्ञावान होण्यासाठी किती विविध वाटा चालतो ते अधिक महत्त्वाचे आहे. म्हणून सत्य नेहमीच परमेश्वरापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत असते. सत्याची वाट निर्भयतेची असते. त्यामुळे जी माणसं सत्याची वाट चालतात, ती समाजकारण, राजकारणात नेहमीच निर्भय असतात. ती आस्तिक असली तरी त्यांच्या वाट्याला आलेला धर्म हा द्वेष, मत्सर, अंहकाराचा असत नाही तर तो फक्त प्रेमाचा असतो. त्यामुळे ही वाट आपल्याला सापडली तर समाजात धर्माच्या नावाखाली होणारे संघर्ष आपोआप थांबतील. जगात धर्माच्या नावाखाली जितकी युद्धं झाली आहेत, तेवढी युद्धं इतर कोणत्याही कारणांनी झालेले नाहीत. धर्माच्या नावाखाली आजवर अनेकांचे मृत्यू झाले आहेत. असे घडत असेल तर तो धर्म चुकीचा आहे, हे निश्चित समजावे. ■■

---

# ज्ञानरूपी ध्यास



राणी नारायण देवकाते
रा. शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे
भ्रमणध्वनी : ९२०९०६८५९३

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची जी ज्योत पेटवली त्या ज्योतीचा ज्ञानरूपी प्रकाश सर्वत्र पसरावा म्हणून पुस्तक जत्रेचा घाट घातला आहे. पुस्तक ज्ञानाचे भांडार आहे. ते सर्वांना मिळावे म्हणून पुस्तक जत्रेचे सर्वांच्या हितासाठी आयोजन केले आहे.

विद्यार्थी, समाजातील सर्व घटकांचा पुस्तकांशी नेहमीच संबंध येतो. सर्वांना विविध प्रकारचे ज्ञान मिळावे, त्यांनी जास्तीत जास्त वाचन करून ज्ञानाच्या कक्षा उंचवाव्यात, त्यांचा सर्वांगीण विकास, प्रगती व्हावी हा उद्देश समोर ठेवून पुस्तक जत्रेचा प्रारंभ केला आहे.

**ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, पुस्तक हे ज्ञानाचे मंदिर**

पुस्तक रूपी मंदिराचे ज्ञान सर्वांना व्हावे, विश्वातील सर्व लेखकांचे ज्ञान पुस्तकांतून मिळते. पुस्तक वाचनामुळे मौखिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक विकास होतो. त्यांची प्रगल्भधता वाढते. आजच्या मोबाईलच्या जगात पुस्तकापासून दूर जाणाऱ्या पिढीला या पुस्तक जत्रेच्या माध्यमातून पुस्तकांची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे. पुस्तकांचे ज्ञान हे शाश्वत असते. ते चिरस्थायी, अमर असते. वाचन केल्याने खूप काही शिकता येते. विविध ज्ञान घेता येते. पुस्तक विश्वाचा आरसा असतो. तो जसे चित्र असेल तेच दाखवतो. पुस्तक माणसाच्या कोंडलेल्या भावनांना वाट करून देतो. मोकळे आकाश देतो आणि हृदयात भरलेल्या अंधाराला प्रेमरूप प्रकाशही पुस्तक देते. पुस्तक कधी पाया होते तर ते कधी कळस, शिखर होते, जे माणसांच्या पायाला भक्कम करते.

**वाचाल तर वाचाल**

पुस्तक वाचले तरच माणूस वाचेल. पुस्तक भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ याचे दर्शन देते. पुस्तकांच्या माध्यमातून इतिहासात काय घडले ते आपल्याला माहीत होते. पुस्तकाच्या माध्यमातूनच चालू घडामोडींचे ज्ञान मिळते. पुस्तक हे गुरू, मित्र बनून ज्ञान देतात व योग्य मार्गदर्शन करतात. पुस्तक नेहमी नवनवीन गोष्टी शिकवते. आपली भाषा सुंदर आणि शुद्ध करते. ते आपल्याला कल्पनेच्या जगातही घेऊन जाते व वास्तव जगही दाखवते. आकाशाचे ज्ञान तर कधी प्रकाशाचे ज्ञान, पुस्तक ज्ञान हे अथांग सागरासारखे अफाट असते. प्रकाशासारखे असते. जगभरातील ज्ञान, विद्वत्ता, विचार, अनुभव, संशोधन आणि संस्कृती, मनोरंजन यांचे ज्ञान पुस्तकांच्या माध्यमातून आपल्याला मिळते. एका व्यक्तिला पूर्ण जग फिरणे शक्य नसते. ते पुस्तकांच्या माध्यमातून साध्य होते.

पुस्तक वाचनाचे खूप फायदे आहेत. ज्ञानाचे भांडार देणारे पुस्तक कल्पनाशक्तिचा विकास करून नवनवीन विचार, कल्पना सर्जनशीलता, बौद्धिकता वाढवते. शब्दसंग्रह वाढवून, भाषा समृद्ध करून संवादकौशल्य सुधारते. पुस्तक मनाला प्रसन्नता, आनंद, उत्साह प्रेम सुख देवून मन शांत करून ताणतणाव कमी करते. पुस्तक विचारशक्ती इतकी विकसित करते की, कल्पनाशक्ती, वैज्ञानिकता वाढवून चिकित्सक व विश्लेषणात्मक वृत्तीची वाढ करते. पुस्तक जीवनाची जगण्याची आणि प्रगतीची गुरुकिल्ली आहे. ते अंधारातील बंद दरवाजे खुले करून, ज्ञानाचा प्रकाश देते.

मानवाचा अनमोल ठेवा म्हणजे पुस्तक. ते कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग तर देतेच पण मानवाला अणुरेणुचा आकारही दाखवते. आजच्या आधुनिक जगात माणसाला वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून इंटरनेच्या जगातही ई-बुक्स, ऑडिओबुक्सच्या माध्यमातून वाचकांना ज्ञान मिळते. एका क्लिकवर सारे जग, ऑनलाईन लायब्ररी यामुळे जवळ आले आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक जत्रेच्या माध्यमातून सर्वांना विविध पुस्तकांतील ज्ञानाची माहिती व्हावी, ज्यांना जे पुस्तक पाहिजे ते पुस्तक या जत्रेच्या माध्यमातून उपलब्ध करून त्यांना ज्ञान देण्याचे काम या अनोख्या जत्रेच्या माध्यमातून केले जाते. म्हणून जाता जाता म्हणावेसे वाटते...

**पुस्तकांच्या ज्ञानाने होते जीवन खास। पुस्तक जगाचा ज्ञानरूपी ध्यास**

प्रति,

सोमवार, दि. ४ ते १० मे २०२६

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा

संपर्क : ७०५७२९२०९२

# दुर्धर आजाराशी लढताना कुटुंबाची साथ महत्त्वाची : प्रा. जोशी

**पुणे (प्रतिनिधी)** : दुर्धर आजाराचे निदान झाल्यानंतर योग्य उपचाराबरोबरच रुग्णाचे मनोबल वाढविण्यासाठी कुटुंबाची साथ तितकीच महत्त्वाची आहे, असे मत प्रसिद्ध लेखक आणि वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले. चपराक प्रकाशनाच्या प्रल्हाद दुधाळ लिखित 'झुंज कॅन्सरशी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी लेखक संजय सोनवणी, प्रकाशक घनश्याम पाटील, नमो हॉस्पिटलचे संचालक डॉ. योगेश भुरट उपस्थित होते.



**पुणे : झुंज कॅन्सरशी या पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून प्रकाशक घनश्याम पाटील, संजय सोनवणी, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. योगेश भुरट, लेखक प्रल्हाद दुधाळ आणि स्मिता दुधाळ.**

प्रा. जोशी म्हणाले, फॅमिली डॉक्टर ही संकल्पना आता कालबाह्य झाली आहे. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातला संवाद हरवला आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन यामुळे चांगले उपचार उपलब्ध असले तरी सर्वसामान्य रुग्णांना ते परवडणारे नाहीत. उपचाराच्या खर्चाचा आर्थिक ताणही कुटुंबावर येत असतो. निवृत्तीनंतर अशा आजारांचे निदान झाल्यास आणि आरोग्यविमा नसल्यास त्याचा भार कुटुंबातल्या तरुण मुलांवर पडतो. याचाही मानसिक ताण रुग्णांवर येत असतो. त्यामुळे तो मानसिकदृष्ट्या अधिक खचतो. अशा काळात कुटुंबाची साथ महत्त्वाची आहे. दुधाळ यांनी आपल्या पत्नीला कॅन्सर झाल्यानंतर तिचे मातृत्व स्वीकारले. तिला भक्कम भावनिक आधार दिला. तिचे मनोबल थोडेही कमी होणार नाही याची काळजी घेतली. प्रत्येक पुरुषाच्या ठाई मातृहृदय असते आणि प्रत्येक स्त्रीच्या ठाई पितृहृदय असते याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना येतो. हे पुस्तक ही प्रेरक आणि संघर्षाची यशोगाथा आहे.

आजार कितीही असाध्य असला तरी मनौधैर्य उंचावलेले असणे गरजेचे आहे. त्यामुळे गंभीर आजारही बरे होतात. विज्ञान-तंत्रज्ञान खूप पुढे गेले आहे आणि अजून ते पुढेच जाणार आहे. सध्या भारत हा तरूणांचा देश आहे आणि वैज्ञानिक क्रांतिमुळे मानवाचे आयुर्मान वाढले आहे. याचाच अर्थ आणखी काही वर्षांनी भारत हा सर्वाधिक ज्येष्ठ नागरिकांचा देश असणार आहे. त्यावेळच्या वैद्यकीय आव्हानांना आपण कसे सामोरे जाणार याचे कसलेच नियोजन देश म्हणून नाही.

आरोग्याच्या दृष्टिने विचार करता सध्या गैरसमजच जास्त आहेत. त्यामुळे अनेक रुग्ण वेळीच तपासण्या करून घेण्यास आणि उपचार करून घेण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळेही मोठा फटका बसतो. दुधाळ दाम्पत्याने वेळीच उपचार घेऊन धैर्याने कर्करोगावर मात केली. त्यामुळे त्यांना खऱ्याअर्थी संघर्षयोद्धा म्हणायला हवे, असे मत संजय सोनवणी यांनी व्यक्त केले.

डॉ. भुरट म्हणाले, या पुस्तकामुळे मला डॉक्टर या नात्याने रुग्णाची मनोअवस्था कळली. आम्ही वैद्यकीय सल्ले देतो, उपचार करतो पण आमच्या बोलण्याचा कसा अर्थ काढला जातो आणि रूग्ण व त्याचे कुटुंबीय काय विचार करतात, ते या पुस्तकाच्या माध्यमातून कळले. कर्करोगाला सामोरे जाणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि डॉक्टर अशा सर्वांसाठी हे पुस्तक उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरणारे आहे.

प्रकाशक घनश्याम पाटील यांनी प्रास्ताविकातून पुस्तक प्रकाशित करण्यामागची भूमिका विषद केली. निवेदक ओंकार दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद येवले, रवींद्र कामठे, चंद्रलेखा बेलसरे, अरुण कमळापूरकर, दयानंद महापुरे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

